**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

१. श्री. नारायण दत्तात्रय थोपटे
२. सौ. रेखाताई नारायण थोपटे
ऊर्फ रेखा किसन कदम
दोघे रा. घर क्र.२३, स.नं.३६/३, नवनाथनगर,
धनकवडी, पुणे- ४११ ०४३ — अपीलकर्ते

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे-४११ ००७ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे-४११ ००७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६४६+२६४७+२८४०+२८४१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ते -** १. श्री. नारायण दत्तात्रय थोपटे
२. सौ. रेखाताई नारायण थोपटे ऊर्फ रेखा किसन कदम
दोघे रा. घर क्र.२३, स.नं.३६/३, नवनाथनगर,
धनकवडी, पुणे- ४११ ०४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे-४११ ००७ डॉ. माणिक जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे-४११ ००७ श्रीमती अरूणा विजय चव्हाण

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| २६४६ / पुणे | १६.९.२००८ | २२.९.२००८ | ७.१०.२००८ | २७.११.२००८ |
| २६४७ / पुणे | १६.९.२००८ | २२.९.२००८ | ७.१०.२००८ | २७.११.२००८ |
| २८४१ / पुणे | २९.१२.२००८ | १.१.२००९ | ५.१.२००९ | २७.११.२००८ |
| २८४० / पुणे | २९.१२.२००८ | १.१.२००९ | ५.१.२००९ | २७.११.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

अपील क्र. २६४६+ २६४७+ २८४०+२८४१ / पुणे

एम.ए. इंग्लिश या विषयांच्या सर्व वर्षांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती, तसेच एलएल.बी. तृतीय वर्षांच्या तीन विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रतींबद्दलची सविस्तर माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नारायण दत्तात्रय थोपटे यांनी एप्रिल २००६ ते एप्रिल २००८ या काळात एलएल.बी. द्वितीय वर्षाच्या आपण पाच वेळा दिलेल्या द्वितीय वर्षाच्या परीक्षेतील सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रतींची मागणी केली होती. तसेच अपीलकर्त्या सौ.रेखाताई नारायण थोपटे यांनी सात वर्षातील एम.ए. इंग्रजी भाग २ परीक्षांच्या आपल्या उत्तरपत्रिकांच्या प्रती मागितल्या होत्या. त्या न मिळाल्याच्या व दिलेल्या प्रती अपूर्ण असल्याच्या कारणावरुन श्री. व सौ. थोपटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे चार अपिले केली आहेत.

आपले पती रिक्षा व्यवसाय करुन आपली व कुटुंबाची उपजिविका पार पाडत आहेत व आपण दोघेही उच्च शिक्षण पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु पुणे विद्यापीठातील काही उच्च अधिकाऱ्यांच्या बेपवाईमुळे अनुत्तीर्ण होण्यामुळे आपल्यावर व आपल्या पतीवर अन्याय होत आहे. गेल्या सात वर्षांत वारंवार तीच परीक्षा आपण देत असून आपल्या चुका कळण्यासाठी उत्तरपत्रिकांच्या प्रती मिळणे आवश्यक असताना त्या दिल्या जात नाहीत, म्हणून संबंधितांना शास्ती करावी, असे लेखी निवेदन सौ.रेखाताई थोपटे यांनी आयोगाला सादर केले असून त्याचाच पुनरुच्चार श्री. नारायण थोपटे यांनी आयोगापुढील सुनावणीत केला. आपली उत्तरपत्रिका

३२ पानांची होती. परंतु विद्यापीठाच्या नव्या नियमानुसार प्रती देताना पंधराच पानांच्या दिल्या, असे प्रतिपादन श्री. थोपटे यांनी केले.

दि.१२ मार्च २००८ पूर्वी विद्यापीठाच्या नियमानुसार उत्तरपत्रिका गोपनीय असल्यामुळे उपलब्ध करुन दिल्या जात नव्हत्या. उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यासंबंधीचा अध्यादेश क्र.१८२ विद्यापीठ अधिकार मंडळाने दि.१२ मार्च २००८ रोजी निर्गमित केला. अध्यादेश ८(१८) नुसार परीक्षांच्या निकालापासून सहा महिन्यांपर्यंतच उत्तरपत्रिका जतन करुन ठेवल्या जातात. त्यामुळे मार्च २००८ पूर्वीच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती देणे शक्य नव्हते. त्या त्यावेळी सौ. व श्री. थोपटे यांना ही माहिती देण्यात आली आहे. अध्यादेश क्र.१८२ मधील कलम १४ नुसार उत्तरपत्रिकेतील कोऱ्या पानांची छायांकित प्रत दिली जात नाही. त्यामुळे श्री. थोपटे यांना ज्यावर काही लिहिलेले होते अशा पंधरा पानांची प्रत देण्यात आली, व कोऱ्या असलेल्या इतर पानांची प्रत दिली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ श्रीमती अरूणा विजय चव्हाण यांनी केले. मूळ उत्तरपत्रिका त्यांनी आयोगापुढे सादर केल्या. त्यात कोऱ्या पुरवण्यांसह ३२ पाने होती.

तीन विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देण्याचा अध्यादेश मार्च २००८ पासून काढण्यात आला. त्यानुसार मार्च २००८ च्या उत्तरपत्रिकांच्या प्रती अपीलकर्त्यांना देण्यात आल्या. तसेच मूळ उत्तरपत्रिकाही दाखविल्या. ते अनुत्तीर्ण होण्यात अन्य कोणत्याही व्यक्तीवर दोषारोप करण्यासारखी परिस्थिती नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, डॉ. माणिक जाधव यांनी केले.

पूर्वीच्याही उत्तरपत्रिका मिळाल्या पाहिजेत, अशा आशयाचे निवेदन अपीलकर्त्यांचे वकील ॲड. बी.एन.जागताप यांनी केले.

अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जानुसार वेळोवेळी सर्व माहिती देण्यात आली आहे, तसेच समक्ष चर्चेतही सर्व बाबी त्यांना स्पष्ट करण्यात आल्या आहेत. आपण व आपली पत्नी यांना संबंधित विषयामध्ये उत्तीर्ण करावे. तसे केल्यास आपण अपील करणार नाही, असे त्यांनी चर्चेत सांगितले होते. राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतरही आपल्याला उत्तीर्ण केल्यास आपण अपिले मागे घेऊ असे त्यांनी सांगितले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्रीमती अरूणा विजय चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव डॉ. माणिक जाधव यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांना सर्व माहिती देण्यात आली आहे. विद्यापीठाच्या नियमानुसार उत्तरपत्रिकांच्या जतनाचा कालावधी ठरलेला असून त्या आधीच्या उत्तरपत्रिका न देणे, हे 'माहिती' नाकारणे ठरत नाही. त्यांनी उपस्थित केलेले अन्य मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विचारात घेता येणार नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२०.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सचिन बापूसाहेब खंडागळे
११४४, स्टेशन रोड, सरकारी दवाखान्याजवळ,
तासगाव, जि. सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७१ / सांगली |
| २ | सनावणीची तारीख | दि. ३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सचिन बापूसाहेब खंडागळे
११४४, स्टेशन रोड, सरकारी दवाखान्याजवळ,
तासगाव, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. रामचंद्र शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. एस. जी. सांगडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.२.२००७ |

| |
|---|
| ८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सचिन बापूसाहेब खंडागळे यांनी जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांच्याकडे केलेल्या अर्जात श्री.पिंटू बापूसाहेब खंडागळे यांना वर्ग ४ मध्ये शिपाई पदावर अनुकंपा तत्त्वावर दिलेल्या नेमणुकी बाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडून ती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. खंडागळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. पिं.बा.खंडागळे यांना अनुकंपा तत्त्वावर शासनाच्या सेवेत नियुक्त करण्याच्या अनुषंगाने सर्व बाबींची तपशीलवार माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली आहे. अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांनीही त्याबाबतची वस्तुस्थिती पाहून अपील फेटाळले. सन १९९६-९७ पासून श्री. खंडागळे नोकरीसाठी आपल्या कार्यालयाकडे अर्ज करीत आले असून वेळोवेळी त्यांना उत्तर देण्यात आले आहे. त्यांचे वडील शासकीय सेवेत असल्याबाबतचा पुरावा मागणी करुनही त्यांनी अद्याप सादर केलेला नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. एस.एस. सांगडे यांनी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. अनुकंपा तत्त्वावरील नेमुणकीबाबतची मागणी हा प्रशासकीय स्वरुपाचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २०.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. बाबुराव भागोजी बोडके
२४९, ए/२ए, गंधर्व अपार्टमेंट, एफ-७,
विवेकानंद कॉलेजजवळ, नागाळा पार्क,
कोल्हापूर- ३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता,
वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. गणेश एन. देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता,
वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. एम.एम.निंबाळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.८.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

नगर भूमापन क्र.२४९ए/२ए क्षेत्र १०३७.५० चौ.मी. जागेत मे. करमरकर वारनुळकर असोसिएटस या भागीदारी संस्थेमार्फत भागीदार श्री. राजेंद्र बाळकृष्ण वारनुळकर यांनी गंधर्व अपार्टमेंट, नागाळा पार्क, कोल्हापूर या इमारतीचे बांधकाम केले असून तसा बांधकाम परवाना दि. ८.८.१९९६ चा आहे, सदर बांधकाम परवाना व त्याबाबतचा रेखांकन नकाशाची प्रत व अनुषंगिक माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बाबुराव भागोजी बोडके यांनी १७ वर्षांपूर्वीची बांधकाम परवानगीची माहिती मागितली होती. नंतरच्या काळातील विकेंद्रीकरणामुळे नगररचना विभाग, क्षेत्रिय कार्यालय आदी ठिकाणी शोध घेऊनही सबंधित कागदपत्रे उपलब्ध झाली नाही, म्हणून संबंधित अपार्टमेंटचे अध्यक्ष / सचिव यांच्याकडे पाठपुरावा करुन माहिती प्राप्त करुन घेतली व मंजूर नकाशाच्या प्रतीसह ती श्री. बोडके यांना देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा उप शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका यांनी लेखी व तोंडी नमूद केले. आपल्याला माहिती मिळालेली असून तक्रार राहिलेली नाही, अपील निकाली काढावे, असे श्री. बोडके यांनी लेखी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि.०८.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.राजाराम शंकरराव पोंदकुले
मु.पो.शिरवली, ता.बारामती, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती बारामती,
ता.बारामती, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिरवली, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७४१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.व्ही.जे.गुळवे

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिरवली, ता.बारामती, जि.पुणे कु.पूनम बापूराव गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२.०९.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.०९.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.१०.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.०१.२००९ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br><br>मौजे शिरवली येथील गावठाण हद्दीतील प्राथमिक शाळा व भाग शाळेच्या खोल्या कोणाच्या मालकीच्या होत्या? सर्व शाळा जिल्हा परिषदेच्या मालकीच्या होत्या तर त्या पाडण्याचा लिलाव करणेचा अधिकार ग्रामपंचायतीला आहे काय याचे स्पष्टीकरण, दि.१५.०८.२००८ च्या ग्रामसभेच्या सर्व ठरावांची नक्कल इ. मुद्दे |

## विवेचन

बांधकाम खात्याने मूल्यांकन केलेले नसताना शाळेच्या खोल्यांचे लिलाव करुन त्याचे तीन लाख रुपये शासनाचे खात्यात न भरता ग्रामपंचायतीकडे ठेऊन अपहार केला, तंटामुक्ती समितीचा अध्यक्ष सभेने निवडावयाचा असतो व सरपंच सदस्य असतो, त्याला अध्यक्ष केले हे कायद्याचे उल्लंघन आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.राजाराम शंकरराव पोंदकुले यांनी लेखी निवेदनात केले. श्री.पोंदकुले यांना माहिती देण्यात आली आहे. प्रथम अपिलाची सुनावणी, राज्य माहिती आयोगाने दि.२४.२.२००९ रोजी आयोजित केलेला 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' व राज्य माहिती आयोगापुढील सुनावणी या तीनही वेळा श्री.पोंदकुले गैरहजर होते. विशिष्ट गृहितावर आरोपांच्या स्वरुपाचे भाष्य करुन ते माहिती मागत असतात, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिरवली, ता.बारामती, जि.पुणे कु.पूनम बापूराव गााकवाड यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.१०.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.यशवंत रघुनाथ राहींज
श्री निवास, शितोळे नगर, मेन रोड,
लिटल फ्लॉवर स्कुल समोर, सांगवी, पुणे ४११ ०२७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यवाह,
डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे ४११ ००४ — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापिका,
एच.ए.स्कुल (प्रा./पु.प्रा.वि.), एच.ए.कॉलनी, पिंपरी, पुणे - १८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७५२+२०६०/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.यशवंत रघुनाथ राहींज
श्री निवास, शितोळे नगर, मेन रोड,
लिटल फ्लॉवर स्कुल समोर, सांगवी, पुणे ४११ ०२७

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यवाह,
डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे ४११ ००४

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.०९.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१३.१०.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०५.११.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०४.१२.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१) दि.२०.०४.१९९३ रोजीचे माझे विनंती अर्जाबाबत अद्याप मला काहीही माहिती देण्यात आली नाही. सदर अर्जातील विषयासंबंधी एच.ए.स्कूल(प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभाग, पिंपरी) शाळेने /डेक्कन एज्युकेशन सोसायटी संस्थेने काय कार्यवाही केली.२) दरवर्षी माझ्यावर प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाची कामे सोपविण्यात आली होती व ती पूर्ण केली त्या यादीची सत्यप्रत अधिकृत देण्यात यावी. ३) दरवर्षीचे गोपनीय अहवाल, ज्यावर दरवर्षी माझी स्वाक्षरी घेण्यात आली आहे. सदर अहवालाची सत्यप्रत अधिकृत करुन देण्यात यावी.

## विवेचन

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या एच.ए.स्कूल(प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभाग, पिंपरी) या शाळेत व्यवस्थापनाने आपल्यावर सोपविलेल्या कामांची यादी व आपल्या गोपनीय अहवालाची प्रत अशी दि.५.७.१९७१ ते २८.२.२००३ या कालावधीतील माहिती आपल्याला मिळाली नाही, ही कागदपत्रे आपल्याला मिळाली नसल्यामुळे सेवानिवृतती वेतन, पदोन्नती आदी लाभांपासून आपल्याला मुकावे लागले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.यशवंत रघुनाथ राहिंज यांनी केली. श्री.राहिंज यांनी संस्थेविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला असून, प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे काही कागदपत्रे त्यांना देण्यात आली नाहीत, तसे त्यांना वेळोवेळी कळविण्यात आले, अन्य माहिती मात्र देण्यात आली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यवाह, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे यांच्या प्रतिनिधी सौ.सुरेखा मिलिंद कुलकर्णीयांनी केले. न्यायालयाने कागदपत्रे देण्यास नेमकेपणाने मनाई केलेली नाही असे आयोगाच्या विचारणेवर त्यांनी नमूद केले. या स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याच्या कारणावरुन माहिती नाकारता येणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व दाखल कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले मान्य करण्यात येत आहेत.

(२) अपीलकर्ता श्री.यशवंत रघुनाथ राहिंज यांच्यावर डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापनाने सोपविलेल्या कामांच्या यादीच्या प्रती साक्षांकित करुन द्याव्यात, तसेच त्यांच्या गोपनीय अहवालाच्या प्रती त्यांना देण्यात याव्यात, डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाहांनी तीन दिवसांत याची पूर्तता करुन आयोगाला अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ५.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

ॲड. श्री.विकास जोशी
साई सदन, प्लॅट नं.२९, चौथा मजला,
पुण्याई नगर, धनकवडी,
पुणे ४११ ०४३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
झोन क्र.२, ढोले पाटील कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण, ढोले पाटील कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७५८/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.०८.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,<br>झोन क्र.२, ढोले पाटील कार्यालय,<br>पुणे महानगरपालिका, पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण, ढोले पाटील कार्यालय,<br>पुणे महानगरपालिका, पुणे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०६.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.०८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१९.०८.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२६.०९.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>जावक क्र.DONO/PMC/MCO/९५,दि.०४.०३.१९९९ रोजी महापालिका आयुक्त यांच्या स्वाक्षरीने एअर कमांडर यांना पाठविलेल्या मिनिटस् ऑफ दि मिटिंगबाबत माहिती मूळ पत्र इन्स्पेक्शनबाबत मागणी | |

## विवेचन

पुणे महानगरपालिका आयुक्त यांच्या स्वाक्षरीने दि.०४.०३.१९९९ रोजी दि.२५.०२.१९९९ च्या बैठकीचे इतीवृत्त पाठविले त्याची पहाणी करु देण्याच्या मागणीनुसार पूर्तता न झाल्याच्या कारणास्तव अपीलकर्ता ॲड. श्री.विकास जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपिलीय प्राधिकाऱ्यांकडील सुनावणीला तसेच दि.२५.०२.२००९ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ला व दि.१२.०८.२००९ रोजी सुनावणीलाही ॲड. श्री.विकास जोशी उपस्थित नव्हते. महानगरपालिका आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कळविल्याची नोंद आहे. परंतु मूळ प्रकरणाचा आढळ होत नसल्याने पाहणीसाठी उपलब्ध करुन देता येत नाही, असे ॲड.जोशी यांना किमान ३ वेळा कळविण्यात आले. १० वर्षांपूर्वीचे प्रकरण असून त्याचा शोध घेण्यात येत आहे. पत्र उपलब्ध होताच त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात येईल, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता,बांधकाम नियंत्रण, ढोले पाटील कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,झोन क्र.२, ढोले पाटील कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक : ०८/ १०/२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ. अनुराधा रविंद्र गरुड
डी-१५, मौर्य विहार , सहजानंद सोसायटी, कोथरुड, पुणे-३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक,
दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, एरंडवणा, पुणे-४

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, एरंडवणा, पुणे-४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६९ / पुणे / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. अनुराधा रविंद्र गरुड
डी-१५, मौर्य विहार , सहजानंद सोसायटी, कोथरुड, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक,
दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, एरंडवणा, पुणे-४ श्रीमती शर्मिष्ठा चिपळूणकर

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, एरंडवणा, पुणे-४ श्री. सचिन व्यवहारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.दत्तात्रय ओमण्णा कडोलकर हे उपरोक्त कालावधीमध्ये आपल्या रुग्णालयात दाखल होते. सदरच्या काळात त्यांना देण्यात आलेला औषधोपचार व त्यांच्या आजाराच्या निदानाबाबतचा सविस्तर तपशील. | |

## विवेचन

दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे येथे आपले वडिल उपचारासाठी दाखल होते. रुग्णालयातून सोडण्यात आल्यानंतर काही दिवसांनी त्यांचे निधन झाले. आजाराचे निदान व त्यांच्यावर करण्यात आलेले औषधोपचार यांची माहिती दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक, दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल यांनी नाकारली. आपण वारस असल्याची कागदपत्रे दाखल करुनसुध्दा माहिती नाकारण्यात आली, असे प्रतिपादन अपीलकर्त्या श्रीमती अनुराधा रविंद्र गरुड यांनी केले.

श्री.दत्तात्रय ओमाण्णा कडोलकर हे रुग्णालयात दाखल होते. एखाद्या रुग्णाबाबतची वैद्यकीय स्वरुपाची माहिती अन्य व्यक्तीला देऊ नये, असा मेडिकल कौन्सिलचा नियम आहे. रुग्ण हयात नसल्यास त्याच्या कायदेशीर वारसाला ही माहिती देता येऊ शकते, परंतु कायदेशीर वारस असल्याचे सिध्द होणे आवश्यक आहे. श्रीमती गरुड यांनी श्री.कडोलकर यांना रुग्णालयात दाखल केले नव्हते. तसेच इतर वारस धारकांचे ना हरकत प्रमाणपत्र त्यांनी दिलेले नाही. या माहितीत कोणत्याही स्वरुपाचा सार्वजनिक हिताचा विषय नाही. त्यामुळे ती नाकारली, असे जन माहिती अधिकारी श्री.सचिन व्यवहारे व अपिलीय प्राधिकारी श्रीमती शर्मिष्ठा चिपळूणकर यांनी नमूद केले.

आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर आपण व आपले भाऊ यांच्यामध्ये कौटुंबिक वाद निर्माण झाले असून त्या संदर्भात आपल्याला ही माहिती हवी आहे, असे श्रीमती गरुड यांनी लेखी व तोंडी नमूद केले. हे लक्षात घेता मागितलेली माहिती सार्वजनिक हिताशी निगडित नाही. तसेच कौटुंबिक वादामुळे कायदेशीर वारसाबाबतची निश्चिती झाल्याशिवाय एखाद्या रुग्णाबद्दलची वैयक्तिक माहिती उघड करणे योग्य नाही. म्हणून माहिती नाकारण्याचा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१ .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वास रावसाहेब भोसले
१४८१, रिसाला रोड, सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा क्रिडाधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७ / सांगली / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विश्वास रावसाहेब भोसले
१४८१, रिसाला रोड, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.अनिल विपत

**जन माहिती अधिकारी** तथा क्रिडाधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.सच्चिदानंद व्हटकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** टेंडर फॉर्म विक्रीच्या शेवटच्या दिवशी पैसे घेऊन फॉर्म न देणे कायद्याने गुन्हा आहे किंवा नाही? टेंडरधारकांच्या अपरोक्ष टेंडर उघडणे हे कायद्याचे उल्लंघन आहे किंवा नाही? अपरोक्ष उघडलेल्या टेंडरविषयी कोणतीही माहिती न देणे मनपाच्या नियमात बसते का? दि.१.३.२००६ ते ३०.१०.२००६ या कालावधीत किती प्रभागात किती रकमेचे क्रिडा साहित्य खेदीसाठीचे टेंडर फॉर्म विकले? भोसले ब्रदर्स, सांगली यांना दि.१८.८.२००६ रोजी विकलेल्या संपूर्ण टेंडर फॉर्मची छायांकित प्रत, तसेच चार प्रभागातील निविदातील फक्त दरपत्रकाचे छायांकित प्रती. | |

## विवेचन

सोलापूर महानगरपालिकेतर्फे निविदा काढून खरेदी करण्यात येणाऱ्या व्यायाम साहित्याविषयीची माहिती आपल्याला विहित मुदतीत जन माहिती अधिकारी तथा क्रिडाधिकारी, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी दिली नाही, अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी कोणतेही कारण न देता अपील फेटाळले. अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विश्वास रावसाहेब भोसले यांनी केली.

श्री.भोसले यांची मुख्य तक्रार निविदा प्रक्रियेत सहभागी होता आले नाही, ही आहे. शेवटच्या दिवशीही फॉर्मचे पैसे घेऊन टेंडर फॉर्म न देणे हा कायद्याने गुन्हा आहे किंवा नाही, अशा स्वरुपाचे प्रश्न त्यांनी विचारले आहेत. त्यांच्या स्वत:च्या संस्थेला विकलेल्या निविदा फॉर्मच्या छायांकित प्रती त्यांनी महापालिकेकडे मागितल्या आहेत. तरीही देय माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.सच्चिदानंद व्हटकर व अपिलीय प्राधिकारी श्री.अनिल विपत यांनी केले.

'आपण करीत असलेल्या फसवणुकीबाबत आपल्यावर न्यायालयीन कारवाई का करु नये याची माहिती द्यावी,' अशा स्वरुपाच्या मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. श्री.भोसले यांचे बव्हंश प्रश्न याच स्वरुपाचे आहेत. तथापि निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने राहिलेली माहिती श्री.भोसले यांना द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्तता केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१.१०.२००९